# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### राज्यातील अंगणवाडी सेविकांची १३ हजार पदे रिक्त असल्याबाबत

**(१) ८३ (२२-१२-२०१४). श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंगणवाडी सेविकांची १३ हजार पदे रिक्त असल्यामुळे एकात्मिक बालविकास योजनेच्या कामावर परिणाम होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास आढळून आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास अंगणवाडी सेविकांची रिक्त असलेली पदे त्वरित भरण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (०९-०३-२०१५) :**(१) अंशतः खरे आहे.
ऑगस्ट, २०१४ च्या मासिक प्रगती अहवालानुसार अंगणवाडी सेविकांची २२५० व मिनी अंगणवाडी सेविकांची १२५७ असे एकूण ३५०७ पदे रिक्त आहेत.
(२) व (३) अंगणवाडी सेविकांची रिक्त पदे भरण्याबाबत वेळोवेळी आदेश दिले आहेत. तथापि भरतीप्रक्रिया त्वरीत होण्यासाठी मुलाखतीचे गुण वगळून गुणवत्तेच्या आधारावर निवड करण्याबाबत दिनांक १३.०८.२०१४ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

---

### हिंगोली जिल्हयातील मोठी धरणे व तलावातील पाणीसाठा आरक्षणाबाबत

**(२) १४४ (२२-१२-२०१४). श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा. वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयांतर्गत येणाऱ्या दोन मोठी धरणे व २५ लहान मोठया तलावात अत्यल्प पाणीसाठी उपलब्ध असून संभाव्य पाणी टंचाई पाहता पाणी साठा आरक्षणाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे माहे ऑक्टोंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भविष्यात जिल्हयातील पाणीटंचाईचा विचार करता पाणी आरक्षणाबाबत कोणता निर्णय घेण्यात आला आहे वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०३-२०१५) :**(१) नाही.

(२) जिल्ह्यातील पाणी टंचाईचा विचार करता पिण्यासाठी आवश्यक असलेला पाणी साठा आरक्षीत करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील एसटी डेपो तोटयात असल्याबाबत**

**(३) २२९ (१५-०१-२०१५). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री. नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील विठ्ठलवाडी डेपो आर्थिकदृष्टया परवडत नसल्याने एसटी महामंडळाने दिनांक १ जुलै, २०१४ रोजी पासून बंद करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील तब्बल ५८ एसटी डेपो गत १० वर्षे सातत्याने तोटयात असल्याची बाब माहे जुलै, २०१४ च्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील एसटी डेपो तोटयात असण्याची कारणे काय आहेत याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (११-०३-२०१५) :**(१), (२) व (३) होय.

(४) प्रामुख्याने इंधन दरामध्ये होणारी वाढ, पथकर दरात होणारी वाढ, कर्मचा-यांवरील वाढता खर्च, महागाई भत्यामधील वाढ इ. कारणामुळे खर्चात वाढ झाल्यामुळे आगारांच्या तोटयात वाढ झालेली आहे. आगारांचा तोटा कमी करण्यासाठी मध्यवर्ती कार्यालयातील खाते प्रमुख व वरिष्ठ अधिका-यांची पालक अधिकारी म्हणून नेमणुक करण्यात आली आहे. पालक अधिकाऱ्यांनी आगारास भेटी देऊन कारणाचा आढावा घेऊन आगार नफ्यात आणण्याच्या दृष्टीने खर्च कमी करणे व उत्पन्नात वाढ करण्यासाठी प्रादेशिक व्यवस्थापक, विभाग नियंत्रक, विभागांतील अधिकारी यांना उपाययोजनांबाबत मार्गदर्शन केले आहे. तथापि, मागील

दोन वर्षांपासुनचा संचित तोटा रु. १४८०.२० कोटी असून तोटा कमी करण्यासाठी प्रवासी कर कमी करणे व महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळास टोल मुक्त करण्याच्या दृष्टीने प्रयत्न चालू असून प्रशासकीय पातळीवर अधिका-यांमार्फत तोटा कमी करण्याचे निकटाने प्रयत्न चालू आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुरबाड (जि. ठाणे) तालुक्यात अंगणवाडयाचे बांधकाम सुरु करण्याबाबत

**(४) २३५ (२२-१२-२०१४). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यात सद्या ३९० अंगणवाडया कार्यरत आहेत परंतु सन २०१०-२०११ व २०११-२०१२ या कालावधीत ८४ अंगणवाडया बांधण्यासाठी मंजूरी देण्यात येऊन ६० टक्के निधीही देण्यात आला मात्र अद्याप अंगणवाडयाचे बांधकाम करण्यात आले नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ८४ अंगणवाडयांचे बांधकाम लवकरात लवकर सुरु करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०९-०३-२०१५) :** (१) मुरबाड (जि.ठाणे) तालुकयात सन २०१०-११ या वर्षात ६९ अंगणवाडी बांधण्यासाठी मंजूरी देण्यात आली आहे व सन २०११-१२ या वर्षात १५ अंगणवाडी बांधण्यासाठी मंजूरी देण्यात आली आहे अशी एकूण ८४ अंगणवाडी बांधकामास मंजूरी देण्यात आली आहे. वरील ६९ अंगणवाड्यांपैकी ४७ अंगणवाडी बांधकमे पूर्ण असून ५ अंगणवाडी बांधकामांची किरकोळ कामे बाकी आहेत तर २ अंगणवाडी बांधकामे जागेअभावी रद्द करण्यात आली आहेत व उर्वरित १५ अंगणवाडी केंद्राचे बांधकाम प्रगतीत आहेत. तसेच २०११-१२ या वर्षातील १५ अंगणवाडीपैकी ११ बांधकामे पुर्ण असून ४ अंगणवाडी बांधकामे प्रगतीपथावर आहेत.

(२) प्रगतीपथावर असलेली बांधकामे तातडीने पुर्ण करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्हयातील कोल्हापूर पध्दतीचे बंधा-यावरील ढावे अनेक वर्ष न बदल्याबाबत**

**(५) ४५३ (२३-१२-२०१४). श्री. बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील घोडनदी, भिमानदी, कुकडी, या नदयांवर अनेक ठिकाणी कोल्हापूर पध्दतीचे बंधारे बांधले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कोल्हापूर पध्दतीचे बंधा-यावरील ढावे अनेक वर्ष न बदल्यामुळे या बंधाऱ्यामधून मोठया प्रमाणात पाण्याची गळती होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे जिल्हयातील घोडनदी, भिमानदी, कुकडी, या नदयांवर अनेक ठिकाणी कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांना नव्याने ढावे बसविण्याबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (११-०३-२०१५) :**(१) होय.

(२) अंशतः खरे आहे.

कोल्हापूर पध्दतीच्या बंधा-यामध्ये ढाव्यांची संख्या जास्त असते. त्यामधून होणारी गळती पुर्णतः बंद करण्यात अडचणी येतात. तथापि गळती झालेले पाणी बंधा-याच्या साखळीत खालच्या बाजूस असलेल्या बंधा-याद्वारे वापरण्यात येते.

(३) मागील तीन वर्षात भिमा व कुकडी नदीवरील अनुक्रमे २४७३, २३१६, व २१७८ अशी नविन लोखंडी बर्गे उपलब्ध झाली आहेत. तसेच भिमा नदीवरील ३२५ बर्ग्यांची दुरुस्ती करण्यात आली आहे. निधी उपलब्धतेनुसार टप्प्या टप्प्याने उर्वरित बर्गे बदलण्याची अथवा दुरुस्ती करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**राज्यातील अंगणवाडी साठी निश्चित करण्यात आलेल्या अभ्यास क्रमास शासनाची मंजूरी मिळाण्याबाबत**

**(६) ५४७ (२२-१२-२०१४). श्री. गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंगणवाडीसाठी निश्चित करण्यात आलेल्या अभ्यासक्रमास अद्याप पर्यत शासनाची मंजूरी मिळाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अभ्यासक्रमास त्वरीत मंजुरी देण्यासंदर्भात शासनातर्फे कोणती तातडीची कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०९-०३-२०१५) :** (१) सदर योजना केंद्र पुरस्कृत असून अंगणवाडीतील ३ ते ६ वर्षे वयोगटातील बालकांसाठी पूर्वशालेय शिक्षण अभ्यासक्रम निश्चित करण्याची कार्यवाही केंद्र शासन स्तरावर सुरु आहे. सद्यःस्थितीत जुनाच अभ्यासक्रम लागू आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई शहरासाठी जिल्हा वार्षिक आराखड्याच्या माध्यमातुन १२७.६८ कोटी रूपयांचा आराखडा मंजुर करून त्यास मान्यता दिल्याबाबत.**

**(७) ६४० (२३-१२-२०१४). श्री. किसन कथोरे (मुरबाड), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा-कळवा) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरासाठी जिल्हा वार्षिक आराखड्याच्या माध्यमातुन सन २०१४-२०१५ साठी १२७.६८ कोटी रूपयांचा आराखडा मंजुर करून त्यास मान्यता माहे जानेवारी २०१४ च्या तिस-या सप्ताहात शासनाने दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेतून आतापर्यंत कोणकोणती कामे करण्यात आली आहेत,
(३) तसेच उर्वरित कोणकोणती कामे किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (११-०३-२०१५) :**(१) मुंबई शहर जिल्ह्याच्या जिल्हा वार्षिक योजना, सन २०१४-१५ करिता खालीलप्रमाणे रु. १२७.६८ कोटी रकमेच्या आराखड्यास मान्यता देण्यात आली आहे.

(रु.लाखात)

| | |
|---|---|
| सर्वसाधारण योजना | १००००.०० |
| अनुसूचित जाती उपाययोजना | २६५१.०० |
| आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी उपयोजना | ११७.३२ |
| एकूण | १२७६.३२ |

(२) व (३) उपरोक्त योजनेतून मुंबई शहर जिल्ह्यातील कृषी व संलग्न सेवा, सामाजिक व सामुहीक सेवा, उद्योग व खाण, सामान्य सेवा, सामान्य आर्थिक सेवा इ. विकास क्षेत्रांच्या योजनांची कामे करण्यात येत आहेत.

जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत घेण्यात येणारी कामे दोन वर्षाच्या कालावधीत पूर्ण होणे अपेक्षीत असुन त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**सिंधुदुर्ग जिल्ह्यातील (दोडामार्ग) हया तिलारी प्रकल्पात गेली ३१ वर्षे रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगारांना पगार देण्यात आला नसल्याबाबत**

**(८) ८५४ (२३-१२-२०१४). श्री. वैभव नाईक (कुडाळ), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील (दोडामार्ग) हया तिलारी प्रकल्पात गेली ३१ वर्षे रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगारांना गेल्या नऊ महिन्यांचा पगारही देण्यात आल्या नसल्याने नुकतेच माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वारंवार मागणी करुनही प्रकल्प अधिकारी लक्ष देत नसल्याने १४ नोव्हेंबरपासून आपल्या न्याय मागण्यांसाठी सर्व कामगार उपोषणास बसणार असल्याच्या इशारा संघटनेने दिला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कामगारांना गेल्या नऊ महिन्यापासून पगार न देण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले?

**श्री. गिरीष महाजन (०७-०३-२०१५) :**(१) हे खरे नाही.

तिलारी प्रकल्पावर सद्यस्थितीत शासनाच्या रोजंदारीवर कोणतेही कामगार काम करत नाहीत. देखभालीच्या निविदेअंतर्गत सदर कामगांराना सामावून घेतल्याने त्यांना रोजगार उपलब्ध झालेला आहे. त्यांना पगाराची अदायगी ठेकेदारामार्फत होते. सदरचा खर्च प्रकल्पावर टाकण्यात येतो.

(२) निविदे अंतर्गत सामावून घेतलेल्या ५२ कामगारांनी दि. १४/११/२०१४ पासून आमरण उपोषण सुरु केले होते. ते त्यांनी दि. १६/११/२०१४ रोजी मागे घेतलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोयना धरणातून जलविद्युत तयार झाल्यानंतर ७४ टीएमसी पाणी मुंबई, रायगड, रत्नागिरी परिसरामध्ये आणण्याबाबतच्या प्रस्तावाबाबत**

**(९) ८५९ (२२-१२-२०१४). श्री. भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोयना धरणातून जलविद्युत तयार झाल्यानंतर समुद्राला मिळणारे सुमारे ७४ टीएमसी पाणी मुंबई, रायगड, रत्नागिरी परिसरामध्ये आणण्याबाबतच्या प्रस्तावाची क्षेत्रीय स्तरावर छाननी पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, यावर केव्हापर्यंत अंमलबजावणी होणे अपेक्षित आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०७-०३-२०१५) :** (१) होय.

(२) सदर प्रस्तावाची अंमलबजावणी बांधा- वापरा या तत्वावर करण्याचा क्षेत्रिय प्रस्ताव आहे. मात्र याबाबत शासन स्तरावरुन अद्यापी कोणताही धोरणात्मक निर्णय झालेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्ह्यातील अंगणवाडी सेविकांचा वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अपमान केल्याच्या निषेधार्थ व थकलेले मानधन या प्रमुख मागण्यांसह इतर प्रलंबित मागण्याबाबत**

**(१०) ८८४ (२२-१२-२०१४). श्री. प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील अंगणवाडी सेविकांचा वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अपमान केल्याच्या निषेधार्थ व थकलेले मानधन या प्रमुख मागण्यांसह इतर प्रलंबित मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघाच्या अध्यक्षांच्या नेतृत्वाखाली माहे नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास मोर्चा काढण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्हा परिषदेकडे मानधनाची रक्कम जमा असून सुध्दा अंगणवाडी कर्मचाऱ्यांना देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (०९-०३-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) मोर्चाच्या वेळी वस्तुस्थिती समजावून सांगितली चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मोहोळ तालुक्यातील (जि.सोलापूर) येथील मलिकपेठ बंधा-याची भिंत तातडीने बांधण्याबाबत**

**(११) ९४३ (२२-१२-२०१४). श्री. रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहोळ तालुक्यातील (जि.सोलापूर) मलिकपेठ बंधा-यासाठी लाखो रुपये खर्च करुन बांधलेली भिंत सन २००१४-१५ च्या पावसाळ्यात पडल्याने मलिकपेठ पुलावरुन होणारी वाहतुक बंद झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बंधा-यातून होणार पाण्याचा विसर्ग थांबावा व वाहतूक पूर्ववत सुरु व्हावी म्हणून सदर बंधा-याची भिंत तातडीने बांधण्यात यावी म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०३-२०१५) :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात गुटखा बंदी केली असताना मोहोळ तालुक्यात (जि.सोलापूर) गुटखा विक्री करण्यात येत असल्याबाबत**

**(१२) ९४६ (२२-१२-२०१४). श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शासनाने गुटखा बंदी केली असतांना मोहोळ तालुक्यात (जि.सोलापूर) राजरोसपणे गुटखा विक्री करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, गुटखा बंदी करण्यासाठी तसेच गुटखा विक्रीला प्रतिबंध न करणा-या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०३-२०१५) :** (१) हे खरे नाही, नमूद ठिकाणी राजरोसपणे गुटखा विक्री केल्या जात नाही. तथापि राष्ट्रीय महामार्ग ६५ वरील टोल नाक्यावर दि. २४/०४/२०१४ रोजी मोहोळ पोलीसांनी रु. २४,१४,०००/- किंमतीचा गुटखा भरलेला टेम्पो पकडून ५ आरोपींना अटक करुन मोहोळ पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मोहोळ (जि.सोलापूर ) शहरात अवैध दारु विक्रीसह वेश्याव्यवसाय व अवैधधंदे सुरु असल्याबाबत**

**(१३) ९४८ (२२-१२-२०१४). श्री. रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोहोळ (जि.सोलापूर) शहरात अवैध दारु विक्रीसह वेश्याव्यवसाय व अवैधधंदे सद्यःस्थितीत सुरु आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार मोहोळ शहरात अवैधरित्या सुरु असलेले धंदे बंद करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०३-२०१५) :**
(१) मोहोळ जि. सोलापूर नमूद ठिकाणी अवैध दारु विक्रीसह वेश्याव्यवसाय सुरु नाहीत. चोरुन चालणा-या दारु व जुगार धंद्याचे एकूण ५२ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(२) व (३) मोहोळ परिसरातील दारु व जुगाराच्या अवैध धंद्याबाबत दाखल गुन्ह्याचा तपास करुन सन २०१४ मध्ये ७० आरोपींना अटक केली असून सुमारे रु. ५४२८९ चा माल जप्त केलेला आहे. अटक आरोपीविरुध्द मा. न्यायालयात दोषारोप दाखल करण्यात आलेले आहेत.
(४) विलंब झालेला नाही.

---

**मोहोळ तालुक्यातील (जि.सोलापूर) आष्टी उपसा सिंचन**
**योजनेचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(१४) ९५१ (२३-१२-२०१४). श्री. रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोहोळ तालुक्यातील (जि.सोलापूर) आष्टी उपसा सिंचन योजनेच्या कामास सन १९९६ मध्ये सुरु करुन अद्याप योजनेचे काम अपूर्ण अवस्थेत असल्याने मोठ्या प्रमाणात क्षेत्र ओलितापासून वंचित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर प्रकल्प तातडीने करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (११-०३-२०१४) :** (१) होय.
(२) नाही.
निधीच्या उपलब्धतेनुसार प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठी भाषा विभागांतर्गत न्याय व्यवहाराच्या मराठीकरणासाठी**
**काम करणारा उपविभाग स्थापन करण्याची केलेली मागणी**

**(१५) १०७० (२२-१२-२०१४). श्री. छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठी भाषा विभागांतर्गत न्याय व्यवहाराच्या मराठीकरणासाठी काम करणारा उपविभाग स्थापन करण्याची मराठी अभ्यास केंद्र व लोकप्रतिनिधीनी केलेली मागणी माहे नोव्हेंबर २०१४ पर्यंत शासनस्तरावर प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) दिनांक २१` जुलै, १९९८ च्या अधिसुचनेनुसार राज्यातील जिल्हा व तालुका पातळीवरील न्यायालयाचे शंभर टक्के कामकाज मराठीतून करण्याबाबतच्या निर्णयाची अद्यापही राज्यात अंमलबजावणी झालेली नसल्याची तक्रार लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, राजभाषा मराठीला मुंबई उच्च न्यायालयाची प्राधिकृत भाषा म्हणून मान्यता मिळण्यासह बॉम्बे हायकोर्टाचे" मुंबई उच्च न्यायालय" असे नामकरण करण्याची लोकप्रतिनिधींनी माहे ऑगस्ट, २०१३ मध्ये वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

४) असल्यास, प्रश्न भाग (१), (२) व (३) बाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?

**श्री. विनोद तावडे (२७-०२-२०१५) :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) प्रश्न भाग १- याबाबत कार्यवाही सुरू आहे.

प्रश्न भाग २ व ३- उच्च न्यायालयात मराठी भाषेचा वापर करण्याच्या दृष्टीने उच्च न्यायालयात आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच बॉम्बे हायकोर्टाचे "मुंबई उच्च न्यायालय" असे नामकरण करण्याबाबत केंद्र शासनाकडून कायदेशीर बाबी तपासण्यात येत आहेत.

---

**सांगली जिल्ह्यातील टेंभू-सिंचन योजनेचा आटपाडी डावा कालवा राजेवाडी तलावापर्यंत वाढविण्याबाबतची केलेली मागणी**

**(१६) ११०६ (२२-१२-२०१४). श्री. अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील टेंभू-सिंचन योजनेचा आटपाडी डावा कालवा राजेवाडी तलावापर्यंत वाढविण्यात यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी व ग्रामस्थांनी माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान अगोदरही वारंवार कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, सांगली यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,

(३) अद्यापही यासंदर्भात कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०७-०३-२०१५) :** (१) अशी मागणी माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये वा दरम्यान करण्यात आलेली नाही. तथापि, मा.गणपतराव देशमुख, विधानसभा सदस्य सांगोला यांनी दि. २६.०४.२०१३ रोजी याबाबत मागणी केलेली आहे.

(२) याबाबत महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांच्या स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खाजगी व सहकारी उपसा सिंचन लाभक्षेत्रात शासनाच्या अनुदानातून चर योजना होणेबाबतचा केलेला प्रस्ताव**

**(१७) १२९१ (१४-०१-२०१४). श्री. राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खाजगी व सहकारी उपसासिंचन लाभ क्षेत्रामध्ये पानथळ व क्षारपड झालेल्या जमिनीची सुधारणा करणेसाठी शासनाचे अनुदानातून चर योजना होणेबाबतचा प्रस्ताव उपविभागीय पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय पुणे-१ यांनी त्यांच्या दिनांक २० ऑक्टोबर, २००८ च्या पत्रान्वये मा.सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावाबाबत शासनाने निर्णय घेतला आहे, तसेच अद्यापही या प्रस्तावाबाबत शासनाने निर्णय घेतला नसल्यास किती कालावधीत या प्रश्नावर निर्णय होणे अपेक्षित आहे,

(३) दौंड तालुक्यातील (जि.पुणे) खाजगी व सहकारी उपसासिंचन लाभक्षेत्रामध्ये किती योजना प्रस्तावित करण्यात आल्या आहेत, तसेच दौंड तालुक्यातील या चर योजनांच्या सद्य:स्थिती काय आहे?

**श्री. गिरीष महाजन (०९-०३-२०१५) :** (१) व (२) पाटबंधारे संशोधन विकास संचालनालय, पुणे यांच्याकडून दि. २०.१०.२००८ व दि.०२.०३.२०१० च्या पत्रान्वये खाजगी व सहकारी उपसा सिंचन लाभक्षेत्रामध्ये पानथळ व क्षारक्षेत्रामध्ये पानथळा व क्षारपड झालेल्या जमिनीची सुधारणा करणेसाठी शासनाचे अनुदानातून चर योजना होणेबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला. त्या अनुषंगाने शासनाने दि. ३/११/२०१४ च्या पत्रान्वये मार्गदर्शक सूचना / उपाय योजना सुचविल्या असून त्या पुढीलप्रमाणे आहेत

उक्त क्षेत्र पाच वर्षे निरिक्षणाखाली ठेवावे, व खालीलप्रमाणे विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवाव्यात व तदनंतर झालेल्या परिणांमाचा आढावा घेवून प्रस्ताव देणेत यावा.

१) लाभक्षेत्रात बारामाही पिकाऐवजी फळ वर्गीय व हंगामी पिकावर भर देण्यात यावा. व आवश्यक तेथे कृषि विभागाचे सहकार्य घ्यावे.

२) परंपरागत पिक पध्दतीने (cropping pattern) मध्ये बदल करण्यात यावा.

३) सिंचनासाठीच्या पाण्याचा इष्टत्तम वापर करण्यास्तव ठिंबक सिंचन / तुषार सिंचन पध्दतीचा शेतीसाठी वापर करण्यात यावा.

४) पाणी वापराबाबत शेतक-यांमध्ये जागरुकता निर्माण करण्यास्तव उपाय योजना राबविण्यात याव्यात.

(३) दौड तालुक्यातील (जि.पुणे) खाजगी व सहकारी उपसा सिंचन लाभक्षेत्रातील प्रस्तावित चर योजनेबाबतची कार्यवाही वरीलप्रमाणे आहे.

---

**चोपडा तालुक्यात (जि.जळगांव) येथे विजेच्या सबस्टेशनकरिता**
**जागा उपलब्ध होत नसल्याबाबत**

**(१८) १३३१ (२७-०१-२०१५). श्री. चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चोपडा तालुक्यात (जि.जळगांव) विजेचे १३२ के.व्ही.चे एकच सबस्टेशन असल्याने धानोरा येथे १३२ केव्ही चे सबस्टेशन मंजूर आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर सबस्टेशनकरिता जागा उपलब्ध होत नसल्याने कामास विलंब होत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, जागा उपलब्ध करण्याकरिता शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०१-२०१५) :** (१) होय, धानोरा, ता.चोपडा, जि.जळगांव येथे २२० के.व्ही. उपकेंद्र उभारण्याची योजना मंजूर आहे.

(२) होय.

(३) २२० के.व्ही.उपकेंद्र उभारणीसाठी आवश्यक तेवढी शासकीय वा एम.आय.डी.सी. ची जमीन

धानोरा येथे उपलब्ध न झाल्याने मौजे डांभुर्णी ता.यावल येथील खाजगी जमीन अधिग्रहणासाठीची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**जळगांव जिल्ह्यातील चोपडा तालुक्यातील मुल मध्यम सिंचन प्रकल्प अंतर्गत पाटचा-यांचे काम पूर्ण झाल्याने हस्तांतरणाबाबत**

**(१९) १३३७ (२३-१२-२०१४). श्री. चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्ह्यातील चोपडा तालुक्यातील मुल मध्यम सिंचन प्रकल्प अंतर्गत पाटचा-यांचे काम पूर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या पाटचा-यांचे प्रकल्पाकडून रावेर सिंचन उपविभागाकडे हस्तांतर करण्याचे शासनाच्या विचारधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामुळे चोपडा तालुक्याच्या शेतक-यांची गैरसोय होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, रावेर उपविभाग सिंचन ऐवजी तालुक्यातील हतनुर पाटबंधारे अंतर्गत सिंचन उपविभागाकडे मुल मध्यम सिंचन प्रकल्प अंतर्गत पाटचा-यांचे हस्तांतर करण्याबत शासन काय कार्यवाही करणार आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२४-०२-२०१५) :** (१) गुळ मध्यम प्रकल्पाचा डावा कालवा, उजवा कालवा वितरिकांची कामे पूर्ण झाली आहेत.

तथापी स्थानिक शेतक-यांच्या मागणीनुसार कालवा व वितरिकेवर काही ठिकाणी रस्तापूल व नाला क्रॉसिंगची कामे प्रगतीपथावर होत शेतक-यांची कामे बाकी आहेत.
(२) दिनांक २७.०८.२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये गुळ प्रकल्पाच्या चोपडा तालुक्यातील लाभक्षेत्रास पाणी मिळण्यासाठी सिंचन व्यवस्थापन साठी विरवाडे ता.चोपडा येथे रावेर उपविभागांतर्गत नविन शाखा कार्यालयाची स्थापना झाली आहे.
(३) शाखेचे मुख्यालय विरवाडे ता.चोपडा येथे असल्याने शेतक-यांच्या गैरसोय होणाचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) गुळ प्रकल्पाचे सिंचन व्यवस्थापनाचे शाखा कार्यालय विरवाडे ता.चोपडा येथे नव्याने उघडण्यात आल्यामुळे हतनूर विभागांतर्गत गुळ मध्यम प्रकल्पाच्या वितरण व्यवस्थेची कामे हस्तांतरीत करण्याची आवश्यकता नाही.

---

**चोपडा-जळगांव रस्त्यावरील तापी नदीवरील विदगांव येथील पूलाच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध होणेबाबत**

**(२०) १३३८ (२२-१२-२०१४). श्री. चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चोपडा-जळगांव रस्त्यावरील तापी नदीवरील विदगांव येथील पूलाच्या दुरुस्तीसाठी पाच कोटी रुपयांपर्यंत खर्च अपेक्षित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यासाठी १० टक्के सुध्दा तरतूद शासनाने केली नाही हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दुरुस्तीचे काम सुरु झाल्यानंतर निधी अभावी कामे प्रलंबित राहिले असून त्यामुळे यावल व चोपडा तालुक्याचा जळगांवशी संपर्क मार्ग बंद होईल हे खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यासाठी पुरवणी अर्थसंकल्पात पूलाच्या दुरुस्तीसाठी जास्तीत जास्त निधीची तरतूद करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-०२-२०१५) :**(१) होय.

(२) नाही. सदर कामासाठी सन २०१४-१५ मध्ये रु.६७.७५ लक्ष रकमेची तरतूद केली आहे.

(३) हे खरे नाही. प्रत्यक्ष काम सुरु झाल्यानंतर पुलावरील वाहतूक दोन महिन्यांसाठी बंद करुन ती पर्यायी रस्त्याने वळविण्यात येणार आहे.

(४) होय, कामासाठी आवश्यक निधी क्षत्रिय कार्यालयांच्या मागणीप्रमाणे उपलब्ध करुन देण्याचे नियोजन आहे.

---

**अंकलेश्वर - बहाणपूर रस्त्यावरील यावल ते गळंगी (ता. चोपडा, जि.जळगांव) बीओटी तत्वाअंतर्गत रस्त्यांची झालेली दुरावस्था**

**(२१) १३३९ (२२-१२-२०१४) श्री. चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंकलेश्वर-ब्व्हाणपूर रस्त्यावरील यावल ते गळंगी (ता. चोपडा, जि.जळगांव) पर्यत काम बीओटी तत्वाअंतर्गत झालेले होते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने बीओटी मधील हा रस्ता काढून त्यावरील टोल नाके बंद करुन परत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग केला आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, हया रस्त्यावर यावल ते गळंगी पर्यत फार मोठया प्रमाणात खड्डे पडल्यामुळे रस्त्यांची दयनीय अवस्था झाली आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, हा रस्ता नविन करण्याकरिता शासनाने निधीची तरतूद केली आहे काय, असल्यास, किती,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०२-२०१५) :** (१) होय.

(२) होय.

(३) होय, तथापि देखभाल व दुरुस्ती अंतर्गत वेळोवेळी रस्त्यावरील खड्डे डांबर व खडीने भरण्यात येत आहे.

निधीच्या उपलब्धतेनुसार नुतनिकरणाचे काम करणेत येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे कोठली (ता.भडगांव जि.जळगांव ) शिवारातील १३२ के. व्ही. क्षमतेचे उपकेंद्र अपूर्णावस्थेत असल्याबाबत.**

**(२२) १३४१ (२७-०१-२०१५). श्री. किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कोठली (ता.भडगांव जि.जळगांव) शिवारातील (नगरदेवळा येथील सूतगिरणी मागील बाजूस) १३२ केव्ही क्षमतेचे उपकेंद्र गेल्या ७ वर्षापासून मंजूर झालेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्यःस्थितीत सदर काम बंद आहे, हेही खरे आहे काय,

(३)सदर उपकेंद्राचे काम पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०२-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे. सदर उपकेंद्रास दिनांक ३०.१२.२०१० रोजी मंजूरी देण्यात आली आहे.

(२) उपकेंद्राचे काम अद्याप सुरु झालेले नाही.

(३) राज्य पारेषण उपक्रम विभागाने सदर उपकेंद्राचा समावेश सन २०१५-२०१६ ते २०१९-२० या पंचवार्षिक योजनेत केला असून त्यानुसार उपकेंद्र उभारणीबाबत कार्यादेश देऊन काम सुरु करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**मौजे.वडजी, मौ.लोणपिराचे तालुका भडगांव तसेच मौ.तारखेडा, मौ.माहिजी ता. पाचोरा (जि. जळगांव) येथील विद्युत उपकेंद्राचे कामाबाबत.**

**(२३) १३४२ (२७-०१-२०१५). श्री. किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे.वडजी, मौ.लोणपिराचे तालुका भडगांव तसेच मौ.तारखेडा, मौ.माहिजी (ता. पाचोरा,जि. जळगांव ) येथे ३३/११ के.व्ही.क्षमतेचे विद्युत उपकेंद्र मंजूर आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामांची सद्यःस्थिती काय आहे,
(३) सदर उपकेंद्र पूर्ण होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०२-२०१५) :** (१) हे अंशतः खरे आहे.
(२) मौजे वडजी, मौ.लोणपिराचे तालुका भडगाव तसेच मौ. तारखेडा, ता.पाचोरा येथे ३३ /११केव्ही विद्युत उपकेंद्र पायाभुत आराखडा-२ अंतर्गत मंजुर असुन मौ. माहिजी येथे ३३ /११ केव्ही नविन उपकेंद्र राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजना -१२ अंतर्गत प्रस्तावित केले आहे.
(३) मौजे वडजी, मौ.लोणपिराचे तालुका भडगाव तसेच मौ. तारखेडा, ता.पाचोरा येथे ३३/११ केव्ही क्षमतेचे विद्युत उपकेंद्र हे पायाभुत आराखडा-२ अंतर्गत मंजुर असून त्यासाठीच्या निविदा मुख्य कार्यालय स्तरावर अंतिम टप्प्यात आहे. तसेच मौ.माहिजी ता.पाचोरा, जि.जळगांव येथे ३३/११ केव्ही नविन उपकेंद्र राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजना -१२ अंतर्गत समाविष्ट केलेले असून त्याची मुख्यालय पातळीवर पडताळणी झाल्यावर केंद्र शासनास मंजूरी करिता पाठविणेत येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाचोरा शहरातील (जि.जळगांव) अनेक लाभधारक शासनाच्या बीपीएल व अंत्योदय या योजनेपासून वंचित असल्याबाबत**

**(२४) १३४६ (१५-०१-२०१५). श्री. किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाचोरा शहरातील (जि.जळगांव) अनेक लाभधारक शासनाच्या बीपीएल व अंत्योदय या योजनेपासून गेल्या १५ वर्षापासून वंचित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही केली तसेच वंचित ठेवणा-या जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास , विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१०-०२-२०१५) :**(१) हे खरे नाही.
पाचोरा शहरातील बीपीएल व अंत्योदय योजनेतील पात्र शिधापत्रिकाधारकांना अन्नधान्याचा नियमित पुरवठा करण्यात आलेला आहे. तसेच राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत प्राधान्य कुटुंब गटातील पात्र लाभार्थ्यांमध्ये पाचोरा शहरातील सर्व पात्र बीपीएल शिधापत्रिकांचा समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार अंत्योदय योजना व प्राधान्य कुटुंब गटातील लाभार्थ्यांना अन्नधान्याचा नियमित पुरवठा करण्यात येत आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासनाने सन २०१४-१५ खरीप पणन हंगामांतर्गत मका पिकाची आधारभुत किंमत खरेदी योजनेची अंमलबजावणीस विलंब झाल्याने शेतकऱ्यांचे झालेले नुकसान**

**(२५) १३४७ (२२-१२-२०१४). श्री. किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सन २०१४-१५ खरीप पणन हंगामांतर्गत मका पिकाची आधारभुत किंमत खरेदी योजनेची अंमलबजावणी माहे नोव्हेंबर, २०१४ पासून सुरु न करता दिनांक १ जानेवारी, २०१५ पासून सुरु करण्यात येणार आहे, हे खरे आहे का,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर अंमलबजावणीस विलंब झाल्यामुळे शेतक-यांचे झालेले नुकसान भरुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१२-०२-२०१५) : (१)** हे खरे आहे.

(२) व (३) आधारभूत किंमत खरेदी योजना ही केंद्र शासनाची योजना आहे. आधारभूत किंमतीचा लाभ होण्याच्या दृष्टीने व शेतकऱ्यांनी हमी भावापेक्षा कमी किंमतीने (डीस्ट्रेस सेल) धान्य विकावे लागू नये म्हणून राज्यशासनातर्फे धान/भरडधान्य (एफ.ए.क्यू.) खरेदी करण्यात येते.

केंद्र शासनाने सर्व राज्यसरकारांच्या अन्न सचिवांसमवेत दि.४.८.२०१४ रोजी आयोजित आलेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार महाराष्ट्र राज्यातील भरडधान्य खरेदीचा हंगाम दि.१ ऑक्टोबर, २०१४ ते दि.३१ मार्च, २०१५ असा निश्चित केला आहे.

तथापि, केंद्र शासनाने दि. १३.१०.२०१४ च्या पत्रान्वये दिलेल्या निदेशानुसार भरडधान्यापैकी मक्याची खरेदी दि.१ जानेवारी, २०१५ पासून सुरु करावयाची होती.

त्यानुसार, राज्य शासनाने दि.३०.१०.२०१४ रोजी आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत धान/भरडधान्य (ज्वारी, बाजारी व मका) खरेदी करण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित केला आहे.

त्याचप्रमाणे दोन्ही अभिकर्ता संस्था तसेच सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी यांना शासनाच्या दि.२.१.२०१५ च्या पत्रान्वये मका खरेदी सुरु करण्याबाबत आवश्यक सूचना पुन:श्च देण्यात आल्या आहेत.

दि. १०.२.२०१५ अखेर राज्यात मका खरेदीसाठी सुरु झालेली खरेदी केंद्र व झालेली भरडधान्य खरेदी पुढीलप्रमाणे आहे.

| खरेदी केंद्र | खरेदी (क्विंटल) | | |
|---|---|---|---|
| | ज्वारी | बाजरी | मका |
| २३९ | ३८,६९८.७० | ०.०० | ३०,६२२.९३ |

**पाचोरा तालुक्यातील (जि.जळगांव) अग्नावती धरणाची मध्य प्रकल्पाच्या भिंतीची उंची वाढविणेबाबत**

**(२६) १३५२ (२३-१२-२०१४). श्री. किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्ह्यातील पाचोरा तालुक्यातील मौजे नगरदेवळा हे १८ ते २० हजार लोकवस्तीचे गाव असून या गावाचे अग्नावती धरण पाणीपुरवठ्याचे मुख्य स्त्रोत असून या अग्नावती धरण मध्य प्रकल्पाच्या भिंतीची उंची वाढविणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाच्या भिंतीची उंची वाढविण्याकरिता ठोस निर्णय घेण्यात आला आहे काय, या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-०२-२०१५) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भडगांव (जि.जळगांव) तालुक्यातील गिरणा नदीवरील के.टी.वेअर बंधाऱ्याच्या प्रस्तावाबाबत**

**(२७) १३५४ (२४-१२-२०१४). श्री. किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भडगांव (जि.जळगांव) तालुक्यातील शहराची लोकसंख्या ३० ते ३५ हजार असून नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी एकमेव स्त्रोत गिरणा नदीवर असतांना त्या शहरासाठी के.टी.वेअर बांधण्याच्या प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२५-०२-२०१५) :** (१) या संदर्भात गिरणा नदीवर सदर प्रश्नात नमूद केल्यानुसार को.प. बंधारा बांधण्याचे प्रस्तावित नाही.

(२) प्रश्न उदभवत नाही.

(३) प्रश्न उदभवत नाही.

---

**संगमेश्वर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) राजीवली धरणातील उजव्या व डाव्या कालव्याची कामे अपूर्ण अवस्थेत असल्याबाबत**

**(२८) १३६९ (२३-१२-२०१४). श्री. शरददादा सोनवणे (जुन्नर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमेश्वर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) राजीवली धरणातून निघणाऱ्या उजव्या व डाव्या कालव्याची कामे अपूर्ण अवस्थेत आहेत तसेच गडनदीवरील कुचांबे येथे मातीचे धरण बांधण्यासाठी १९८३ मध्ये १०.३७ कोटींच्या रकमेला मंजूरी मिळाली असतानाही आजमितीस काम सुरु झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) राजीवली धरणातून निघणाऱ्या उजव्या कालव्याचा लाभ चिपळूण तालुक्यातील कुटरे गाव, येगाव, नांदगाव खुर्द, नांदगाव बुद्रुक, कुशिवडे, असुर्डे, नायशी, वडेरु, खेरशेत तर संगमेश्वर तालुक्यातील आरवली, कोंडीवरे, बुरंबाड, सरंद, मुरडव, कुंभारखाणी आणि कुचांबे यांना होणार असून प्रकल्पाचे काम रेंगाळल्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात एकीकडे मोठया प्रमाणात वाढ होत असून शेतकरीही सिंचनापासून वंचित राहिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू कामे शीघ्रगतीने हाती घेऊन पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२४-०२-२०१५) :** (१) राजीवली व गडनदी ही स्वतंत्र धरणे नसून गडनदीवरील कुचांबे गावाजवळील गडनदी हा मध्यम प्रकल्प आहे, व या प्रकल्पाच्या बुडित क्षेत्रात राजीवली या गावाचा समावेश आहे. गडनदी प्रकल्पास सन १९८३ मध्ये १०.३७ कोटीच्या रकमेला मूळ प्रशासकीय मान्यता प्राप्त असून प्रकल्पाचे काम सन १९८७ मध्ये सुरु करण्यात आले असून सद्यःस्थितीत धरणाचे मातीकाम पूर्ण असून सांडव्याचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. प्रकल्पीय पाणी साठा ८३.२१२ दलघमी असून आजमितीस ७५.६२ दलघमी पाणीसाठा निर्माण करण्यात आला असून प्रकल्पाच्या कालव्याची कामे प्रगतीपथावर आहेत.

(२) गडनदी प्रकल्पास उजवा कालवा ४७ कि.मी. असून कि.मी.२० पर्यंत व डावा कालवा १ ते ७ कि.मी. पर्यंत बहुतांशी कामे पूर्ण आहेत. उर्वरीत लांबीतील कालवा कामासाठी भूसंपादन प्रक्रिया चालू असून उजवा व डाव्या कालव्यावर जून, २०१४ अखेर १३६६ हेक्ट्र सिंचन क्षमता निर्माण झाली असून सिंचनासाठी मागणीप्रमाणे पाणी सोडण्यात आले आहे.

(३) गडनदी प्रकल्पाची कामे शिघ्रगतीने पूर्ण होण्याच्या दृष्टीने सदर प्रकल्पाचा समावेश वेग वर्धित सिंचन लाभ प्रकल्पामध्ये (A.I.B.P) करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नागपूर शहरातील नंदनवन पोलीस स्टेशन अंतर्गत पवनसुत नगर येथे भरदिवसा चोरी झाल्याबाबत

**(२९) १३७८ (२२-१२-२०१४). श्री. सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री. विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री. कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील नंदनवन पोलीस स्टेशन अंतर्गत पवनसुत नगर येथे माहे नोव्हेंबर, २०१४ च्या दुस-या आठवड्यात भरदिवसा जबरी चोरी झाल्याचे दिनांक १५ नोव्हेंबर, २०१४ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोपीला मुद्देमालासह अटक करण्यात आलेली आहे काय,

(३) असल्यास, नागपूर शहरात चो-या व सोन-साखळी चोरीच्या घटनांमध्ये प्रचंड वाढ झाल्याने महिलांमध्ये असुक्षिततेची भावना निर्माण झाली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नागपूरातील गुन्हेगारी रोखण्याकरिता पोलीसांनी केलेल्या उपाययोजना काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०२-२०१५) :**(१) होय.

(२) व (३) नाही.

(४) नागपूर शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत घडणा-या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी गस्त पथकांची वाढ करण्यात आली आहे. या मोहिमेमध्ये वरिष्ठ पातळीवरील अधिका-यांना देखील गस्त घालण्यात यावी व त्या दरम्यान हजर असलेल्या कर्मचा-यांना देखील वेळोवेळी निर्देश देण्यात यावेत. याबाबत पोलीस आयुक्त आणि पोलीस सह आयुक्त दररोज आढावा घेत आहेत.

एप्रिल, २०१४ पासून गुन्हेशाखेच्या नियंत्रणात ४० कर्मचा-यांचे विशेष पथक, शस्त्र, वॉकी- टॉकी, मोटार सायकलसह दिवस-रात्र दोन पाळीत गस्त लावण्यात आली आहे. सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हेशाखा नागपूर शहर येथून दररोज ३ जिप गाड्या ज्यामध्ये पोलीसांची (महिला पोलीससह) गस्त लावण्यात आली आहे. तसेच वरिष्ठ अधिकारी सहाय्यक पोलीस आयुक्त व पोलीस उप आयुक्त हे महत्वाचे वेळी स्वतः गस्तीवरील पोलीस कर्मचा-यांची पाहणी करतात. तसेच नव्याने २३ पोलीस वाहने (पोलीस गस्तीपथक) लोकसदृश अशा महत्वाचे ठिकाणी नेमण्यात येऊन त्यांस नजिकचे संवेदनशील ठिकाणी गस्तीकरिता पाठविण्यात येते.

---

**रत्नागिरी जिल्ह्यातील २२३ दुग्धव्यवसाय विकास संस्थापैकी**
**तब्बल १६५ संस्था बंद पडल्याबाबत**

**(३०) १३९९ (२२-१२-२०१४) श्री. राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील २२३ दुग्धव्यवसाय विकास संस्थापैकी तब्बल १६५ संस्था बंद पडल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संस्था बंद पडण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या बंद पडलेल्या संस्थांचे पुनरुज्जीवन करण्याकरिता शासनाने कोणते प्रयत्न केले वा करण्यात येत आहे,

(४) याबाबतीत कोणतेच प्रयत्न केले नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२७-०१-२०१५)** :(१) होय, हे खरे आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील एकूण २२२ प्राथमिक सहकारी दूध संस्थांपैकी १५७ संस्था बंद आहेत. १ संस्था अवसायनात आहे व ६४ संस्था चालू आहेत.

(२) दुभती जनावरे पालन पोषण संदर्भात दूध उत्पादक शेतक-यांचे अज्ञान त्याचप्रमाणे अपु-या पशु वैद्यकीय सोयी, खाजगी दूध व्यवसायात असलेली स्पर्धा तसेच दूध वाहतुक, दूध साठवणुक व दूध प्रक्रिया उद्योगाचा अभाव, सहकारी संस्थांच्या बळकटीकरणाचा अभाव इत्यादी कारणामुळे सहकारी दूध संस्था बंद पडलेल्या आहेत.

(३) व (४) बंद संस्था चालु होण्याकरीता शासनातर्फे राष्ट्रीय कृषि योजनेअंतर्गत श्रीकृष्ण सहकारी दूध उत्पादक संस्था, मु.शिंपोशी, ता.लांजा व अमृतधारा दूध उत्पादक सहकारी संस्था मु.मुढे, ता.चिपळूण या दोन्ही संस्थांना दि.१४ /०७/२०१० रोजी प्रत्येकी रु. ४६.६८ लक्ष अर्थसहाय्य वितरीत करण्यात आले आहे. जननी सहकारी दूधउत्पादक संस्था ता.संगमेश्वर ही बंद असलेली संस्था चालु करुन दूध संकलन चालू केले आहे. त्याचप्रमाणे मंडणगड तालुक्यातील बंद संस्थांच्या संचालक मंडळ व सभासदांची सभा मंडणगड येथे दि. २९/१०/२०१३ रोजी घेण्यात आली आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील सर्व तालुक्यामध्ये सहायक निबंधक सहकारी

संस्था (दुग्ध), रत्नागिरी यांच्या स्तरावर बैठकी आयोजित करुन व त्यामध्ये संचालक मंडळ व सदस्यांना योग्य ते मार्गदर्शन करुन बंद संस्था चालु करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**पंचायत राज मंत्रालयाने ईपीआरआय प्रकल्पाअंतर्गत नेमण्यात आलेल्या डाटा ऑपरेटर्सच्या पगाराची तरतूद करण्यात न आल्याबाबत**

**(३१) १४०० (२२-१२-२०१४). श्री. राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ग्रामीण भागील सर्वसामान्य जनतेच्या सुखसोयीसाठी देण्यात येणा-या केंद्र शासनाच्या १३ व्या वित्त आयोगातील ८० टक्के रक्कम डाटा ऑपरेटरच्या पगारासाठी खर्च केली जाते,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे शिल्लक राहणा-या तटपुंज्या रक्कमेतून ग्रामपंचायतींना विकास कामे करता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) केंद्र शासनाच्या पंचायत राज मंत्रालयाने ईपीआरआय हा प्रकल्प सर्व राज्यांमध्ये राबविण्याचा निर्णय घेतला असताना त्यासाठी नेमण्यात आलेल्या डाटा ऑपरेटर्सच्या पगाराची मात्र तरतूद करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(४) तसेच सदरचे काम खाजगी कंपनीला दिले असल्याने त्याचा थेट फायदा करुन देण्यासाठीच या डाटा ऑपरेटर्सचे पगार या १३ व्या वित्त आयोगातून थेट खर्च केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-०२-२०१५) :** (१), (२), (३) व (४)

ई-पंचायत हा राष्ट्रीय विकास कार्यक्रम असल्याने या प्रकल्पासाठी १३ व्या वित्त आयोगाचा निधी वापरण्याच्या मार्गदर्शक सुचना केंद्रशानाकडून देण्यात आल्या होत्या. या प्रकल्पासाठी केंद्रशासनाकडून वेगळ्या स्वतंत्र निधीची तरतूद करण्यात आलेली नाही. हा प्रकल्प राज्यशासन, जिल्हा परिषद, पंचायत समित्या व ग्रामपंचायतीकडून राबविण्यात येत आहे. महाऑनलाईन (महाराष्ट्र शासन व टाटा कन्सल्टंन्सी यांची सहभागीदारी कंपनी) ही या प्रकल्पाची फक्त अंमलबजावणी यंत्रणा आहे व याप्रकल्पासाठी लागणारे प्रशिक्षित तांत्रिक मनुष्यबळ, तंत्रज्ञान सहाय्य/ग्रामपंचायत स्तरावरील कंझ्युमेबल्स इ. सेवा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी महाऑनलाईनची आहे. या सेवांपोटी महाऑनलाईनला संबंधित पंचायती राज संस्था मोबदला अदा करतात.

(५) राज्यातील सर्व पंचायती राज संस्थांच्या कारभारात एकसुत्रता व पारदर्शकता आणून त्यांचा कारभार ऑनलाईन करणे, त्यांचे सक्षमीकरण करणे व नागरिकांना जास्तीत जास्त सेवा - सुविधा, दाखले त्यांचे रहिवासी क्षेत्रातच उपलब्ध होऊन नागरिकांचा पैसा, श्रम व वेळ वाचावा या उद्देशाने ई-पंचायत हा राष्ट्रीय विकास प्रकल्प राज्याकडून राबविण्यात येत आहे.

---

### कसबा गावातील (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी ) मंदिराची झालेली दुरावस्था

**(३२) १४०८ (२२-१२-२०१४). श्री. राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कसबा (ता.संगमेश्वर,जि.रत्नागिरी) येथे चालुक्य राजवटीतील अनेक मंदिरे असून या मंदिराची दुरुस्ती न केल्याने सदरील मंदिरांची दुरवस्था होवून त्यांचे काही अवशेष इतरत्र विखुरलेल्या स्वरुपात पडलेले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मंदिरांच्या शिल्पकलेचा अभ्यास करण्यासाठी देश विदेशातील अभ्यासक या भागांमध्ये येत असतानाही सदरील मंदिरांची दुरुस्ती करण्यात येत नाही हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मंदिराची शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, व त्यानुसार सदर निधीची तरतूद करण्यासह मंदिराच्या दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-०२-२०१५) :** (१) अशंतः खरे आहे.

कसबा, ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी येथे प्राचीन व ऐतिहासिक महत्वाची एकूण ८ मंदिर असून ती काहीशा दुरावस्थेत आहेत हे खरे आहे. तथापि त्यांचे अवशेष इतरत्र विखुरलेल्या स्वरुपात आहेत हे खरे नाही.

(२) व (३) कसबा संगमेश्वर येथील प्राचीन अवशेषांची व वास्तुंची पाहणी पुरातत्व विभागाने माहे ऑक्टोबर, २०१० मध्ये केली असून या ठिकाणी प्राचीन व ऐतिहासिक महत्व असलेली एकूण ८ मंदिरे आढळून आली. सदर मंदिरांची महसूलविषयक माहिती व नकाशे मागविण्यात आले होते. त्यानुसार श्री कर्णेश्वर मंदिर समूह म्हणून ०३.०२.२०१२ च्या अधिसूचननेनुसार राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्यात आले आहे. या मंदिराच्या जतन व दुरुस्तीकरीता तेराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्र शासनाकडून प्राप्त होणा-या निधीतून निधीची तरतूद करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### लांजा तालुक्यातील (जि.रत्नागिरी) जंगलतोड व वाढत्या तापमानामुळे वनौषधीं नष्ट होत असल्याबाबत

**(३३) १४११ (२२-१२-२०१४). श्री. राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लांजा तालुक्यातील (जि.रत्नागिरी) जंगलतोड व वाढत्या तापमानामुळे वनौषधींचा नष्ट होत असल्याचे नुकतेच माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आंबा, काजू, फणस, सतांबे, जांभूळ, साग खैर, पळस, चंदन, आद वृक्षांबरोबरच अनेक दुर्मिळ वनौषधीचा देखील नष्ट होत चालला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले,
(४) तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०९-०३-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राजापूर तालुका (जि. रत्नागिरी) कृषी कार्यालयासाठी मंजूर पदांपैकी तीस कर्मचा-यांची पदे रिक्त असल्याबाबत

**(३४) १४१२ (२७-०१-२०१५). श्री. राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजापूर तालुका (जि.रत्नागिरी) कृषी कार्यालयासाठी मंजूर पदांपैकी अद्यापी तीस कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याचे नुकतेच माहे ऑक्टोंबर,२०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त पदे रिक्त असल्यामुळे इतर कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा ताण पडत असून शेतकऱ्यांची देखील गैरसोय होत आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पदे रिक्त राहण्यामागची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे, त्यात काय आढळून आले,
(५) चौकशीअंती सदरहू रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१०-०२-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही. रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार नजिकच्या क्षेत्रीय कर्मचाऱ्यांकडे देऊन कामे करुन घेतली जात आहेत व दिलेल्या लक्षांकानुसार कामे पूर्ण करण्यात आली आहेत त्यामुळे शेतकऱ्यांची गैरसोय होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) कोकण विभागात गट-क संवर्गात निम्न संवर्गातून पदोन्नतीकरीता पात्र उमेदवार उपलब्ध होत नाहीत तसेच सेवानिवृत्ती, बदली इ. कारणांमुळे सदरची पदे रिक्त आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) गट-क संवर्गातील पदे भरण्याकरिता सन २०१३ मध्ये घेण्यात आलेल्या भरती प्रक्रियेमधील प्रतीक्षा यादीवरील उमेदवारांमधून काही पदे व उर्वरित पदे सरळसेवेने भरती प्रक्रिया राबवून भरण्याचा प्रयत्न केला जाईल.

---

**पाचल (ता. राजापूर, जि. रत्नागिरी) येथील अर्जुन कालव्याचे खोदकाम अर्धवट अवस्थेत असल्याबाबत**

**(३५) १४१३ (२३-१२-२०१४). श्री. राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचल (ता. राजापूर, जि. रत्नागिरी) येथील अर्जुन कालव्याचे खोदकाम गेल्या तीन वर्षापासून अर्धवट अवस्थेत असल्याने या प्रकल्पातील आलेल्या कालव्यातील मातीचे ढीगच्या ढीग शेतात वाहून येत असल्यामुळे तळवडेतील शेतक-यांची शेती धोक्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे काम अर्धवट अवस्थेत असण्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच या नुकसानग्रस्त शेतक-यांना शासनाकडून कोणती मदत दिली वा देण्यात येत आहे,

**श्री. गिरीष महाजन (२४-०२-२०१५) :**(१) अंशतः खरे आहे.

अर्जुना कालवा खोदाई मुळे नुकसान झालेले नाही. तथापि, सन २०१३ च्या पावसाळ्यात दि. २, ३ व ४ जुलै, २०१३ रोजी झालेल्या अतिपर्जन्यवृष्टीमुळे डाव्या कालव्याजवळील डोंगराचा भाग नैसर्गिकरित्या खचून माती वाहून आल्याने कालव्याचे व खालील बाजूचे तळवडे गावातील शेतीचे नुकसान झाले आहे.

(२) केंद्रीय पर्यावरण विभागाच्या तत्कालीन बंदी (Moroterium) मुळे दगड, वाळू व खडी इ. गौण खनिज उपलब्ध होत नसल्याने नियोजित प्रगती राखता न आल्याने कालवा बांधकामे अपूर्णावस्थेत आहेत.

(३) सदर घटनेच्या दि. २२.०१.२०१४ रोजी तहसिलदार यांनी पंचनामा केलेला असून नुकसान भरपाईची कार्यवाही महसूल विभागामार्फत करण्यात येत आहे.

---

**राज्याच्या मत्स्यविभागातील ३८० हून अधिक पदे रिक्त असल्याबाबत**

**(३६) १४१६ (२७-०१-२०१५). श्री. राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या मत्स्यविभागातील ३८० हून अधिक पदे रिक्त असल्याचे नुकतेच माहे सप्टेंबर, २०१४ मध्ये उघडकीस आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रथम, व्दितीय श्रेणीची जवळपास ७५ पदे रिक्त असून कारकूनाची २०० हून अधिक पदे रिक्त असल्याचे मत्स्य विभाग कार्यालयातून उघडकीस आले आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, रिक्त पदे न भरण्याची कारणे काय आहेत,

(४) तद्नुसार रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१०-०२-२०१५) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे, मत्स्यव्यवसाय विभागातील विविध संवर्गाची सप्टेंबर,२०१४ अखेर एकूण ३५४ पदे रिक्त आहेत.

(२) होय, हे अंशत: खरे आहे, मत्स्यव्यवसाय विभागातील गट -अ ची ४१ आणि गट-ब ची ४८ पदे रिक्त आहेत. कारकुनांची (लिपिक वर्गाची) एकूण २१७ पदे रिक्त आहेत.

(३) पदभरती प्रक्रिया सुरु आहे.

(४) गट-अ व ब संवर्गातील रिक्त पदे भरणेबाबत शासन स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे. गट-क व ड संवर्गातील १५२ पदे भरण्यासाठी जाहिरात प्रसिध्द केली असून पदभरती प्रक्रिया सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली येथील पूर्णा पाटबंधारे विभागात प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी वर्गाच्या कमतरतेमुळे कामामध्ये होत असलेली अनियमितता**

**(३७) १४२२ (२२-१२-२०१४). श्री. जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली येथील पूर्णा पाटबंधारे विभागात प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी वर्गाची पदाची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अधिकारी व कर्मचारी वर्गाच्या कमतरतेमुळे कामामध्ये अनियमितता होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाकडून करावयाची कार्यवाही ?

**श्री. गिरीष महाजन (२८-०१-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे.

विभागाचा सुधारित आकृतीबंध तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) नाही.

(३) प्रश्न उभ्दवत नाही.

---

**पूर्णा नदीवर(ता. औंढा, जि.हिंगोली) पोटा व वसतम तालुक्यातील परळी व पिंपळगांव-कुटे येथील प्रस्तावित असलेली बंधारे**

**(३८) १४२३ (२२-१२-२०१४). श्री. जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पूर्णा नदीवर (ता. औंढा, जि.हिंगोली) पोटा व वसतम तालुक्यातील परळी व पिंपळगांव-

कुटे या ठिकाणी मोठे बंधारे प्रस्तावित केलेले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त बंधा-यास अद्याप प्रशासकीय मान्यता मिळालेली नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, पाण्याची उपलब्धता असूनही प्रशासकीय मान्यता न मिळण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदर बंधा-यास शासन तातडीने मंजूरी देऊन निधी उपलब्ध करणार आहे काय?

**श्री. गिरीष महाजन (२३-०२-२०१५) :** (१) होय.
(२) होय.
(३) सदर बंधारे आर्थिक मापदंडात बसत नाहीत.
(४) सदर बंधारे आर्थिक मापदंडात बसत नसल्याने प्रश्न उद्भवत नाही.

---

**खामगाव तालुक्यात (जि.बुलढाणा) बलात्काराच्या घटना घडल्याबाबत**

**(३९) १४२७ (२२-१२-२०१४). डॉ. संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगाव तालुक्यातील (जि.बुलढाणा) खामगाव, साखरखेडी, शेगाव ग्रामीण चामणगांव बढे या पोलिस स्टेशनाच्या हद्दीत माहे नोव्हेंबर, २०१४ च्या पहिल्या पंधरवड्यात बलात्काराच्या ५ घटना घडल्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात आतापर्यंत किती जणांना व कोणत्या कलमान्वये अटक करण्यात आली आहे,
(३) असल्यास, त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०२-२०१५) :** (१) होय.
(२) व (३) सदर ५ घटनेतील पकडण्यात आलेले आरोपी व त्यांच्यावर करण्यात आलेली कारवाई पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पोलीस स्टेशन /अपराध क्रमांक/ लावण्यात आलेली कलमे | पकडण्यात आलेले आरोपी | केलेली कारवाई |
|---|---|---|---|
| १ | साखरखेडी अप.क्र.१४७ /१४ भा.द.वि. कलम ३७६,३४ | ९ | सदर घटनेतील आरोपींविरुध्दच्या कागदपत्रांची तपासणी करुन न्यायालयात सादर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. |
| २ | धामणगाव बढे अप.क्र. ५४ /१४ भा.दं.वि. कलम ३७६ (ड), ५०६ | ४ | आरोपीची वैद्यकीय तपासणी झालेली असून सद्यःस्थितीत गुन्हा पोलीस तपासावर आहे. |
| ३ | खामगाव श. अप.क्र. २०७/१४ भा.दं.वि. कलम ३६३,३७६ | १५ | आरोपींची वैद्यकीय तपासणी झालेली असून सद्यःस्थितीत गुन्हा पोलीस तपासावर आहे. |
| ४ | शेगाव ग्रामीण अप.क्र. ७२/१४ भा.दं.वि.कलम ३६३,३७६,३४ | ०१ | पोलीस तपास पुर्ण झाला आहे. प्रकरण न्यायालयात सादर करण्यात येत आहे. |
| ५ | नांदुरा अप.क्र. १३९ /१४<br>भा.दंवि. कलम ३७६(२), ४५२ | ०१ | सदर गुन्ह्यातील आरोपींविरुध्द पुरावे प्राप्त झाले असून गुन्ह्याचा तपास पूर्ण करण्यात आला आहे.<br>आरोपींविरुध्द विशेष अतिरिक्त सत्र न्यायालय, मलकापूर येथे क्रि.के.नंबर १/१५ दिनांक ०७.०१.२०१५ अन्वये प्रकरण दाखल करण्यात आले आहे |

---

**मेहकर (जि. बुलढाणा) अंत्री देशमुख येथे पिण्याच्या पाण्यात**
**नारूसदृश कृमी आढळून आल्याबाबत**

**(४०) १४३० (२२-१२-२०१४). डॉ. संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंत्री देशमुख ( ता.मेहकर, जि. बुलढाणा) येथे पिण्याच्या पाण्यात नारूसदृश कृमी माहे नोव्हेंबर, २०१४ च्या दुस-या आठवडयात आढळून आल्या तसेच या भागात अज्ञात तापाची साथही सुरू आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, साथ आटोक्यात आणण्याकरिता तसेच पिण्याचे शुध्द पाणी उपलब्ध करून देण्यासंदर्भात कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१०-०२-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) व (४) नळ योजनेची पुरवठा विहीर ही नदी पात्रात असून विहीरीचे खाली कॉक्रीट बंधारा आहे. बंधा-यातील पाणी विहीरीचे छीद्रा मधून आत येत असल्याने ग्रामपंचायतीने ते छिद्र बंद केले आहे. सध्या स्वच्छ पाणी पुरवठा सुरु आहे.

---

**उबाळखेड (जि.बुलढाणा ) येथील नुकसानग्रस्त शेतक-यांना**
**कृषी केंद्राने नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(४१) १४३३ (२२-१२-२०१४). डॉ. संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा ग्राहक मंचाने दिनांक १० नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास उबाळखेड (जि.बुलढाणा) येथील नुकसानग्रस्त शेतक-यांना कृषी केंद्राने नुकसान भरपाई तातडीने देण्याचे आदेश दिले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नुकसानग्रस्त शेतक-यांना तात्काळ नुकसानभरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१०-०२-२०१५) :**(१) होय, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, बुलढाणा यांच्याकडे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा ग्राहक मंचाने शेतकऱ्यांच्या बाजूने निर्णय दिलेला आहे.

(२) जिल्हा ग्राहक मंचाने दिलेल्या निकालाच्या विरोधात संबंधित कंपनीने मा.स्टेट कन्झुमर

डिस्प्युट्स रिड्रेसल कमिशन महाराष्ट्र, नागपूर खंडपीठ येथे अपील दाखल केलेले असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गोंदिया जिल्ह्यातील रायमनगर येथील बँक ऑफ इंडिया येथील शाखेत शाखा व्यवस्थापकांच्याच सहभागाने केलेली अफरातफर**

**(४२) १४३४ (१५-०१-२०१५). डॉ. संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यातील रायमनगर येथील बँक ऑफ इंडिया येथील शाखेत शाखा व्यवस्थापकांच्याच सहभागाने अडीच लाखांची अफरातफर केल्याचे दिनांक १३.११.२०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०२-२०१५) :**(१) होय.

(२) सदर प्रकरणी पो.स्टे. रामनगर येथे अप.क्र.९२ / २०१४ भा.द.वि. कलम ४२०, ४६५,४६७,४६८, ४७१, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चामोर्शी (जि.गडचिरोली) शहरापासून ३ किमी अंतरावर असलेल्या वैनगंगा नदीघाटावर वाघिण मृतावस्थेत आढळल्याबाबत**

**(४३) १४३५ (२२-१२-२०१४). डॉ. संजय रायमुलकर (मेहकर), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चामोर्शी (जि.गडचिरोली) शहरापासून ३ किमी अंतरावर असलेल्या वैनगंगा नदीघाटावर दिनांक १२ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास वाघिण मृतावस्थेत असल्याची आढळून आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेची चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०२-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) सदर घटनेचा दिनांक १२.११.२०१४ रोजी वनगुन्हा नोंदविण्यात आला असून सहाय्यक वनसंरक्षक (तेंन्दू) आलापल्ली हे तपास करीत आहेत. पशुधन विकास अधिकारी

(वर्ग-I) चामोर्शी यांचे शवविच्छेदन अहवालानुसार वाघिणीचा मृत्यू नैसर्गिकरित्या झाल्याचे निष्पन्न झालेले आहे. वाघिणीच्या मृत्यूचे नेमके कारणाचा शोध न लागल्याने मृत वन्यप्राण्याचे नमुने रासायानिक विश्लेषक, विभागीय प्रयोगशाळा नागपूर व संचालक, CCMB, Lacones हैद्राबाद येथे पाठविले आहेत. तसेच आजुबाबुच्या परिसरात वाघिणीचा आढळ असल्यामुळे काही पुरावा मिळतो काय याबाबत तपासणी सहाय्यक वनसंरक्षक (तेंदू) व वन परिक्षेत्र अधिकारी, चामोर्शी यांच्या मार्फत सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील पाणलोट क्षेत्राचा अनुशेष ३० हजार कोटींवर गेल्याबाबत**

**(४४) १४३६ (२३-१२-२०१४). डॉ. संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पाणलोट क्षेत्राचा अनुशेष ३० हजार कोटींवर गेला असून त्यांचा फटका शेती विकासाला बसत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याकरिता शासनाने पाणलोट क्षेत्र विकासाचे नवे नियोजन केले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या नव्या नियोजनाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, या नव्या नियोजनानुसार कार्यवाहीस केव्हापासून सुरूवात करण्यात येणार आहे?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०३-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### शेगाव (जि.बुलढाणा) येथे अटक असलेल्या आरोपीचा झालेला मृत्यू

**(४५) १४३८ (१५-०१-२०१५). डॉ. संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेगाव (जि.बुलढाणा) येथे किरकोळ कारणावरून अटकेत असलेल्या आरोपीचा दिनांक ११.११.२०१४ रोजीच्या सुमारास मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मृत्यूची सीआयडी चौकशी करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०३-२०१५) :**(१) हे खरे आहे.

(२) व (३) सदर आकस्मात मृत्यूची चौकशी पोलीस उप अधिक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग, बुलढाणा हे करीत असून सदर आकस्मिक मृत्यूचा चौकशी सुरु आहे.

---

### महाड (जि.रायगड) येथील रासायनिक औद्योगिक क्षेत्रातील वाढत्या जल व वायूप्रदुषणामुळे जनतेचे आरोग्य धोक्यात आलेबाबत

**(४६) १४८६ (२२-१२-२०१४). श्री. अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) येथील रासायनिक औद्योगिक क्षेत्रातील वाढत्या जल व वायूप्रदुषणामुळे जनतेचे आरोग्य धोक्यात आले असून आरोग्याची समस्या अतिशय गंभीर होत असल्याचे दिनांक १७ ऑक्टोबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औद्योगिक क्षेत्रातील वाढते प्रदुषण रोखण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२३-०२-२०१५) :**(१) हे खरे नाही.

महाड एम.आय.डी.सी. मधील जल व वायु प्रदुषणामुळे बाधीत रुग्ण बाहय रुग्ण विभागात आढळून आला नसल्याचे वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र बिरवाडी, ता.महाड, जि.रायगड यांनी त्यांचे अहवालात नमुद केले आहे.

(२) आणि (३)

महाड औद्योगिक क्षेत्रातील मोठया व मध्यम स्वरुपाची कारखान्यांनी औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी प्राथमिक, व्दितीय तर काही कारखान्यांनी त्रिस्तरीय स्वरुपाची औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा बसविलेली आहे. आर.ओ., एम.ई.ई. तसेच

ड्रायर या सारखी अत्याधुनिक प्रक्रिया यंत्रणादेखील काही मोठ्या तसेच मध्यम कारखान्यात बसविण्यात आली आहे. कारखान्यातील प्रक्रियाकृत औद्योगिक सांडपाण्याचा काही प्रमाणात पुनर्वापर केला जातो. व उर्वरित औद्योगिक सांडपाणी पुढील प्रक्रियेकरीता सामाईक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेकडे पाठविण्यात येते. सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्रातील प्रक्रियाकृत औद्योगिक सांडपाणी महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाच्या बंदिस्त पाईपलाईनव्दारे २३ कि.मी. अंतरावरील सावित्री नदीच्या पात्रात ओवळे येथे विसर्जित करण्यात येते. महाड औद्योगिक क्षेत्रातील उद्योगांनी हवा प्रदुषणासाठी आवश्यक त्या हवा-प्रदुषण नियंत्रण संयंत्रणा उभारल्या आहेत.

महाड औद्योगिक क्षेत्रातील उद्योगांची महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून नियमित पाहणी केली जाते. पाहणीदरम्यान प्रदुषण विषयक अटी व शर्तींचे उल्लंघन करणा-या उद्योगांविरुध्द जल प्रदुषण (प्रतिबंध व नियंत्रण) कायदा-१९७४ तसेच हवा प्रदुषण (प्रतिबंध व नियंत्रण) कायदा-१९८१ अंतर्गत कारवाई करण्यात येते.

---

**कृष्णा-कोयना उपसा सिंचन योजना (म्हैसाळ भाग) योजनेतील**
**नियमबाह्य खर्चामुळे जत तालुक्यावर झालेल्या अन्यायाबाबत**

**(४७) १४९९ (२४-१२-२०१४). श्री. विलासराव जगताप (जत) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृष्णा-कोयना उपसा सिंचन योजनेमध्ये जत तालुक्याचा समावेश १९९७ साली झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेमध्ये २००४ साली बऱ्याच उपसा सिंचन योजना व अग्रणी नदीवरील कोल्हापूर टाईपचे बंधारे मंजूर झाले, हे खरे आहे काय,

(३) तसेच केंद्र व राज्य शासनाच्या २००९ च्या सांमजस्य करार (M.O.U) प्रमाणे जत रीच व म्हैसाळ रीच साठी वेगळ्या रक्कमेची तरतूद केली, हे खरे आहे काय,

(४) सांमजस्य कराराप्रमाणे जत रीच साठीची रक्कम खर्च न करता कवठेमहांकाळ रीच साठी खर्च केली, हे खरे आहे काय,

(५) इ.स.२००४ साली नंतर मंजुर झालेली अनेक उपसा सिंचन योजना व अग्रणी नदीवरील कोल्हापूर पध्दतीचा बंधाऱ्यासाठी अंदाजे रक्कम रु.२०० कोटी खर्च केले हे खरे आहे काय,

(६) अशा प्रकारे नंतर मंजूर केलेली व कवठे महांकाळ रीच साठी रक्कम खर्च केल्याने सांमजस्य करार (M.O.U) भंग झाला हे खरे आहे काय,

(७) याप्रकरणी संबंधित असलेल्या जबाबदार अधिका-यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,

(८) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२४-०२-२०१५) :** (१) होय.

(२) सन २००० मध्ये येरळा नदीवरील ४ को.प.बंधारे व सन २००१ मध्ये मूळ गव्हाण, विस्तारीत गव्हाण, बनेवाडी, डोंगरवाडी व आगळगांव जाखापूर या ४ उपसा सिंचन योजनांना मान्यता देण्यात आली. तसेच अग्रणी नदीवरील १२ को.प. बंधा-यांचा समावेश सन २००४ साली मंजूर प्रकल्प अहवालात करण्यात आला आहे.

(३) नाही.

(४) नाही.

(५) नाही.

(६) सामंज्यस्य करारानुसार प्रकल्पास रिच निहाय निधी उपलब्ध करुन दिला जात नाही. त्यामुळे त्याचा भंग होण्याचा प्रश्न उदभवत नाही.

(७) प्रश्न उदभवत नाही.

(८) प्रश्न उदभवत नाही.

---

**भारती विद्यापीठ पुणे या शिक्षण संस्थेस शासनाने दिलेल्या जमिनीबाबत**

**(४८) १५०० (२२-१२-२०१४). श्री. विलासराव जगताप (जत) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारती विद्यापीठ पुणे या संस्थेस शासनाने जमिन मागणीच्या वेळेस उक्त विद्यापिठाचा प्रस्ताव नसतांनाही तसेच फॉरेस्टच्या जमिनी केंद्र शासनाची परवानगी न घेता केवळ साध्या अर्जावर जमिनी नियमबाह्यरित्या दिल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने किती जमिनी उक्त संस्थेस दिल्या आहेत त्यापैकी वनीकरण जमिनी किती आहेत तसेच ज्या कारणासाठी जमिनी दिल्या त्याच कारणासाठी जमिनीसाठी वापर झाला आहे काय,

(३) नसल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२०-०२-२०१५) :**(१) हे खरे नाही.

तथापि, मौजे दिघी, ता.श्रीवर्धन, जि.रायगड येथील गट नं.२३३ मधील १.०० हेक्टर क्षेत्रामध्ये कांदळवन संवर्धन आणि एकात्मिक कांदळवन व मत्स्यशेती प्रात्यक्षिक पध्दतीसाठी वापर करण्यास परवानगी मिळण्याकरिता वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत प्रस्ताव वनविभागास प्राप्त झाला होता. सदर प्रस्ताव त्रुटी पूर्ततेसाठी प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना परत करण्यात आला असून प्रस्ताव अद्यापि केंद्र शासनास सादर करण्यात आलेला नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोनुर्ले (ता.शाहूवाडी जि.कोल्हापूर) येथील पाटबंधारे मध्यम प्रकल्पाचे काम अद्याप सुरु नसल्याबाबत**

**(४९) १५०७ (२४-१२-२०१४). श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोनुर्ले (ता.शाहूवाडी जि.कोल्हापूर ) या ठिकाणी सन २००१ मध्ये शासनाने पाटबंधारे मध्यम प्रकल्प मंजूर केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर काम करण्याचे आदेश शासनाने दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, अजुनही या प्रकल्पाचे काम सुरु नाही, हे खरे आहे काय,

(४)असल्यास, सदर काम तात्काळ सुरु करण्यासंबंधी शासन कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येणार आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२५-०२-२०१५) :** (१) सोनुर्ले (ता.शाहूवाडी जि. कोल्हापूर) या लघु पाटबंधारे प्रकल्पास महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने दि. ०८.११.२००० रोजीच्या निर्णयानुसार प्रशासकीय मान्यता दिली आहे.

(२) सदर काम करण्याचे आदेश महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने म.कृ.खो.वि.म. अधिनियम १९९६ मधील कलम १८ अंतर्गत प्राप्त अधिकारानुसार दिले आहेत.

(३) प्रकल्पाचे काम माहे मार्च २०१२ मध्ये सुरु झाले आहे.

(४) प्रकल्पावर तांत्रिक अडचणी असल्याने सध्या काम बंद आहे धरणाचे सुधारित संकल्पन मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचेकडून तातडीने पूर्ण करुन घेण्यात येत आहे.

(५) प्रश्न उदभवत नाही.

---

**शाहूवाडी ( जि. कोल्हापूर) तालुक्यातील ग्रामपंचायतींनी वीजेचे गंजलेले खांब बदलण्याची मागणी केल्यबाबत.**

**(५०) १५०८ (२२-१२-२०१४). श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शाहूवाडी( जि. कोल्हापूर) तालुक्यातील ग्रामपंचायतींनी ७०९ गंजलेले खांब बदलणे विषयी महावितरण कंपनीकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वीजेचे खांब कोसळून लोकांच्या जिवितास धोका पोहोचू शकतो असे असतांना नवीन खांब बसवण्याबाबत कंपनीने कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय

(३) सदर खांब तात्काळ बदलणेविषयी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३०-०१-२०१५) :** (१) होय.
(२) नाही.
(३) शाहूवाडी तालुक्यामध्ये उच्चदाबाचे ३१ पोल व लघुदाबाचे ६६ पोल बदलले आहेत. तसेच गंजलेल्या ४४ खांबांना वेल्डींग करुन सुस्थितीत ठेवले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.